स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य शास्त्र विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन

या विषयात पीएच.डी. संशोधनासाठी

संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

'महाराष्ट्राच्या लोकप्रशासन विकासात यशदाचे योगदान : एक अभ्यास'

संशोधकाचे नाव

डॉ. बबन जोगदंड

संशोधक विद्यार्थी

संपर्क : 9823338266

मार्गदर्शक

डॉ. बी. आर. कत्तुरवार

एम. ए., पीएच.डी.

विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक

लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र

देगलूर महाविद्यालय, देगलूर

संपर्क : 9423305870

जुलै -२०२१

महाराष्ट्राच्या लोकप्रशासन विकासात यशदाचे योगदान : एक अभ्यास

१. प्रस्तावना

'इंग्रजीतील ॲडमिनिस्ट्रेशन' हा शब्द लॅटिन भाषेतील 'ॲड' व 'मिनिस्टर' या दोन शब्दांच्या संयोगातून बनला आहे. याचा अर्थ सेवा देणे, मार्गदर्शन करणे, नियंत्रण ठेवणे असा होतो. मराठीतील लोकप्रशासन' हा शब्द लोक आणि प्रशासन या शब्दांच्या संयोगातून जन्माला आला आहे. यातील लोक हा शब्द अनेक अर्थांनी वापरला जातो, पण बहुधा हा शब्द शासनविषयक अर्थाने वापरला जातो. लोकप्रशासन या शब्दाचा सरळ, साधा-सोपा अर्थ शासनविषयक प्रशासन असाही होतो.

लोकप्रशासनाचा शास्त्र म्हणून आधुनिक काळात उदय झाला असला तरी ही प्रक्रिया प्राचीन काळापासून अस्तिवात आहे. वुड्रो विल्सन यांनी १८८७ साली लिहिलेल्या STUDY OF ADMINISTRATION या शोधनिबंधातून राज्यशास्त्रापेक्षा लोकप्रशासन विभक्त असल्याचे सांगितले, त्यामुळे त्यांना लोकप्रशासनाचे जनक म्हटले जाते. त्यांनी लोकप्रशासनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की “लोकप्रशासन हे कायद्याचे सविस्तर प्रगटीकरण होय. पर्सी मैक्वीन यांनी लोकप्रशासनाची व्याख्या करताना केंद्रीय तसेच स्थानीय सरकाराच्या कार्याशी संबंधित असलेले प्रशासन म्हणजे लोकप्रशासन असे म्हटले आहे. एल.डी. व्हाईट यांनी लोकप्रशासनात त्या सर्व क्रियांचा समावेश होतो ज्यांचा वैधानिक सत्याद्वारे निश्चित केलेल्या सार्वजनिक धोरणाचे क्रियान्वयन हा असतो, असे म्हटले आहे.

लोकप्रशासन हे एक प्रगतीशील शास्त्र असून त्यामध्ये अधिकाधिक जनतेचे कल्याण हे शासनाचे उद्दिष्ट असते. प्रशासन लोकाभिमुख करण्यासाठी अनेक अंगानी प्रयत्न करण्यात येतात. त्यातील प्रशिक्षण हे महत्त्वाचे अंग होय. भारतासारख्या विकसनशील देशात अनेक राज्यांमध्ये प्रशासकीय प्रशिक्षण संस्था तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांची क्षमतावृद्धी करुन लोकाभिमुख प्रशासनासाठी अधिकाऱ्यांना तयार करतात. ज्या राज्यात अशा प्रशिक्षण संस्था आहेत त्यांना प्रशासकीय प्रशिक्षण संस्था Administrative Training Institute (ATI) असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता 'यशदा' ही महाराष्ट्र

शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था असून ती देशामध्ये नावजलेली संस्था आहे. या संस्थेमार्फत राज्यभरातील शासनाच्या वर्ग-१ व वर्ग-२ या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण होते. 'प्रशिक्षणात प्रावीण्यम्' हे यशदाचे ब्रीद वाक्य असून यशदाने प्रशिक्षणात देशपातळीवर आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे. त्यामुळे देशातील प्रमुख प्रशिक्षण संस्थामध्ये यशदाचा नामोल्लेख आदराने होतो. यशदाचे प्रशिक्षण कार्य, उद्दिष्टे, रचना आणि कार्यपद्धती याचा विचार करता मसुरीच्या लालबहादुर शास्त्री आय. ए. एस. राष्ट्रीय प्रशिक्षण संस्थेनंतर भारतामधील एक उत्कृष्ट प्रशिक्षण संस्था म्हणून यशदाची गणना केली जाते.

यशदाची सुरुवात मुंबईत झाली. एक प्रशासकीय महाविद्यालय म्हणून ही स्थापना झाली. ही बाब राज्याच्या प्रशासकीय इतिहासाला वळण देणारी ठरली. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी यात विशेष लक्ष घातले व महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशासकीय महाविद्यालय स्थापन करण्यास प्रोत्साहित केले. याच प्रयत्नांना यश येऊन १ नोव्हेंबर १९६३ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या हस्ते मुंबई येथे प्रशासकीय महविद्यालयाची स्थापना करण्यात आली. ही संस्था म्हणजे प्रशासकीय यंत्रणेमध्ये सुधारणा घडवून आण्यासाठी एक प्रयत्न होता. १९८४ पर्यंत ही संस्था मुंबईमध्ये कार्यरत होती, परंतु मुंबईतील दगदगीचे वातावरण व जागेचा प्रश्न यामुळे त्यानंतर पुण्यामध्ये राजभवनच्या प्रशस्त आवरात ही संस्था स्थलांतर झाली व १ मे १९८६ रोजी संस्था नोंदणी अधिनियम १९६० अन्वये या संस्थेची धर्मादाय कार्यालयाकडून नोंदणी करण्यात आली व या संस्थेला स्वायतेचा दर्जा बहाल झाला. संस्थेचे वाढीव कार्य लक्षात घेता संस्थेला महाराष्ट्र विकास प्रशिक्षण संस्था Maharashtra Insitute of DevelopmentAdministration (मिडा) असे नाव देण्यात

आले, नंतर २६ जुलै १९९० रोजी ही संस्था महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व आधुनिक महाराष्ट्राचे जनक दिवंगत यशवंतराव चव्हाण यांनी स्थापन केल्याने त्यांचे नाव या संस्थेस देवून यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (Yashwantrao Chavan Academy of DevelopmentAdministration) असे नामकरण करण्यात आले. इंग्रजी अक्षरातील पहिल्या अक्षरावरुन YCADA यशदा असे संक्षिप्त नाव पुढे रुढ झाले. आता या संस्थेच्या कार्याला ३५ वर्ष झाले आहेत.

या संस्थेमध्ये महाराष्ट्रातील बहुतांशी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतल्याने व या प्रशिक्षणाचा लोकप्रशासनासाठी उपयोग झाल्याने महाराष्ट्रातील लोकप्रशासन विकासात यशदाचे योगदान अभ्यासणे हा या संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे.

२. साहित्य समालोचन आणि संशोधन विषयाचा विकास

प्रशिक्षण या विषयाबाबत आंतरराष्ट्रीय पातळीपासून स्थानिक पातळीपर्यंत अनेकविध प्रकारे संशोधन करण्यात आले आहे. या संशोधनाचे थोडक्यात समालोचन केले असता पुढील वैशिष्ट्ये लक्षात येतात.

व्यवस्थापनाच्या सर्व स्तरांवरील कार्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्याची निर्मिती करण्यासाठी, त्यात सुधारणा घडवून आण्यासाठी किंवा सचेतन निर्माण करण्यासाठी केलेला सुधारित प्रयत्न म्हणजे प्रशिक्षण होय, असे डिमॉक यांनी म्हटले आहे. डॉ. एम. पी. शर्मा यांनी प्रशिक्षणाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, “नोकरांच्या बुद्धीमतेत, सुनियोजितपणे कार्य कुशलतेत वाढ करण्यासाठी आणि त्यांचा विकास करण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे प्रशिक्षण होय. याबाबत Public Adminstration हा ग्रंथ **Annamalai Murugen** यांनी लिहिला असून यात त्यांनी म्हटले आहे की, PublicAdminstraion is a dedicated academic field. Itessentially deals with the machin ery and procedures of government activites. Adminstration has been defined as a cooperative human effort towards achieving some common goats.

DevelopmentAdminstration हा R.K. Sapru यांनी ग्रंथ लिहिला असून या ग्रंथात त्यांनी विकास प्रशासन म्हणजे काय हे नमूद केले आहे. ते म्हणतात The expansion of the study of public adminstration towards 'development adminstration' is a response to the idea that something more is ineeded. This dones not imply that development adminstration is subservient to public adminstration. the former refers to organised efforts to carry out development-oriented goals, the latter to the general or regulatory adminstration of govrnment.

Training for Development Nation हा ग्रंथ Ro**lifP. Lynton and UdalPareek** यांनी लिहिला असून यामध्ये त्यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व विषद केले आहे. The training goals, properly set by work organizations, guide decisions about resource strategies.

Training Managers the international Guide हा ग्रंथ Nanc**y G. Menutty** यांनी लिहिला असून या ग्रंथात त्यांनी The objectives of the program are to impress on middle and lower levels of management the importance of human relations in decision making and the skill of communication. असे म्हटले आहे. हे विवेचन या अभ्यासासाठी उपयुक्त आहे.

Training for Governance in the states i de **Rakesh Hooja, Jajesh Singh, V. K. Sharma** यांनी लिहिला असून त्यात प्रशिक्षण हे प्रशासनाचा दर्जा सुधारण्यास मदत करते असे म्हटले आहे. Training, has always been the tested tool for improving the quality of governance. The governemtn is a key player in development process, for creating conditions which could lend dyna mism to the national effort in persoonel development.

Reserach Methods हा RamAhuja यांनी ग्रंथ लिहिला असून त्यात त्यानी संशोधनाबद्दल भाष्य केले 341. Conducting social research requires clarity of concepts and theretical knowledge of scientific behaviousral studies. असे म्हटले आहे.

- PublicAdministration हा A**nnamalai Murugan** यांनी हा लिहिलेला ग्रंथ असून त्यामध्ये विकास

प्रशासनावर स्वतंत्र प्रकरण आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, विकास प्रशासन हे लोकप्रशासनाचे महत्त्वाचे अंग आहे.

अशाप्रकारे संशोधकांनी विविध ग्रंथामध्ये लोकप्रशासन, विकास प्रशासन व प्रशिक्षण याबाबत चर्चा केली असली तरी त्यामध्ये यशदा या संस्थेचा अभ्यास झालेला नाही. त्यामुळे हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. ३. अभ्यासाची उद्दिष्टे

कोणतेही संशोधन हे सुनिश्चित उद्दिष्टांवर आधारलेले असते. या संशोधनातील प्रमुख उद्दिष्टे पुढे नमूद केली आहेत.

१) महाराष्ट्रातील लोकप्रशासनात यशदाचे योगदान शास्त्रीयपणे अभ्यासणे.

२) यशदाची उद्दिष्टे व विविध प्रशिक्षण कार्यक्रम यातील सुसंगती शोधणे.

३) श्रेणी १, २ व ३ च्या अधिकारी-कर्मचारी यांच्याकरिता आयोजित केल्या जात असलेल्या प्रशिक्षण योजनांचे स्वरुप लक्षात घेणे.

४) संस्थेच्या रचना व कार्यपद्धतीचा चिकित्सक अभ्यास करणे.

५) लोकप्रशासनाच्या विकासाच्या दृष्टीने यशदाच्या प्रशिक्षणातील अडचणी लक्षात घेऊन त्यासाठी यथायोग्य उपाय सूचित करणे.

४. गृहितके

संशोधनात संशोधकाने प्राप्त परिस्थितीत अधिक चिकित्सा न करता आधारभूत मानलेली परिस्थिती म्हणजे गृहितके होय. गृहितकांची व्याख्या करताना संशोधन पद्धती या ग्रंथात डॉ. प्रकाश देशपांडे व डॉ. एन. के. पाटोळे म्हणतात. गृहितके म्हणजे एक पूर्वानुमान काढणे होय. तो तर्क असतो त्यामुळे संशोधकाला एक दिशा प्राप्त होते.

या संशोधनातील प्रमुख गृहितके पुढे दिली आहेत.

१) यशदाचे शिक्षण कार्ये लोकप्रशासनाच्या दृष्टिने नाविन्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे.

२) महाराष्ट्राच्या प्रशासनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने यशदामधील प्रशिक्षण कार्यक्रम आखले जातात.

सुनिश्चित केलेल्या ध्येय, उद्दिष्टानुसार यशदाने आपली प्रशिक्षण कार्यसंस्कृती विकसित केली आहे.

४) यशदाने प्रशिक्षणाबरोबरच संशोधन व विकास शासनास सल्ला व सेवा हे कार्य सुरू ठेवले आहे.

५) यशदाने CPTP एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम विकसित केला आहे.

६) यशदाची वाटचाल प्रशासकीय विद्यापीठाच्या दिशेने चालू आहे.

५. संशोधन पद्धती

कोणतेही संशोधन हे निश्चित पद्धतीवर आधारलेले असते. या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येईल. या आराखड्याचे स्वरूप व महत्त्व सांगताना डॉ. एन. के. पाटोळे यांनी असे म्हटले आहे की,

वर्णनात्मक निरीक्षणाचे लिखित साहित्याशी पुष्कळसे साम्य आहे. निरीक्षक प्रथम एखाद्या घटनेचे, परिस्थितीचे निरीक्षण करतो आणि नंतर वर्णन करतो. निरीक्षक हा प्रत्यक्ष निरीक्षक असतो. लिखित वाङ्मय व वर्णनात्मक निरीक्षणे यामध्ये मूलभूत भेद आहे. लिखित वाङ्मयाच्या लेखनाच्या वेळी लोकांच्या मनात संशोधनाचा विचार नसतो, परंतु निरीक्षणात मात्र प्रत्यक्ष संशोधन हाच मुख्य हेतू असतो. त्यालाच आदर्शमूलक सर्वेक्षण किंवा वर्णनात्मक सर्वेक्षण असे म्हणतात व या संशोधनातून मिळणारी माहिती ही आदर्शमूलक, वर्णनात्मक सर्वेक्षण आधारसामुग्री होय'.

हा आराखडा वापरताना विविध घटकांचा अभ्यास करून शोध समस्यांबाबत तथ्यांचे संकलन करण्याचे आणि विविध पैलुंचे साधार व शास्त्रीय वर्णन करणे. हा आराखडा कृतीत आणताना सामाजिक सर्वेक्षण ही पद्धत वापरण्यात येईल.

सामाजिक सर्वेक्षण : महाराष्ट्राच्या लोकप्रशासनातील यशदाचे योगदान अभ्यासण्यासाठी यशदामध्ये प्रशिक्षण घेतलेल्या व घेत असलेल्या ३०० अधिकारी-कर्मचाऱ्यांची सामाजिक पाहणी करण्यात येईल. त्यासाठी ४० प्रश्नांची प्रश्नावली गुगल फॉर्मद्वारे विकसित करण्यात येईल. तसेच प्रशिक्षणाशी संबंधित प्रशिक्षक, व्याख्याते, अधिकारी अशा ३० तज्ज्ञांच्या विशेष मुलाखती घेऊन त्याआधारे काही महत्वपूर्ण पैलू उलगडण्यात येतील. ६. अभ्यासाचे महत्त्व कुठलाही संशोधन विषय हा वर्तमान संदर्भात कसा व किती महत्त्वाचा आहे. ते विचारात घ्यावे लागेल. या अभ्यासाचे महत्त्व खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

• प्रशिक्षण आधुनिक लोकप्रशासनाचा आत्मा होय. या दृष्टिने उत्तम दर्जाचे प्रशिक्षण कसे दिले जाते, याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. यशदातील प्रशिक्षणाचा सध्याचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी हा अभ्यास अधिक उपयुक्त ठरेल. - 'प्रशिक्षणात

प्राविण्यम्' हे यशदाचे ब्रीद आहे. त्या अनुषंगाने विचार करता प्रशिक्षणातून प्राविण्य आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी सतत प्रयत्न करणे हे यशदाचे उद्दिष्ट्ये आहे. त्यानुसार प्रशिक्षित अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्राविण्यस्तर कसा व किती उंचावतो हे अभ्यासले पाहिजे.

- कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे हे प्रशिक्षणाचे उद्दिष्ट असते. त्यासाठी आदर्श तत्त्वज्ञान व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे आणि व्यवहार कृतीत आणण्यासाठी हा अभ्यास फलदायी ठरू शकेल. आधुनिक काळात प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकारी-कर्मचाऱ्यांची कौशल्ये विकसित करता येतात. त्यादृष्टिने प्रशिक्षणानंतर कर्मचाऱ्यांच्या कौशल्यांची किती वाढ होते, याबाबत हा अभ्यास दिशादर्शक ठरू शकेल. करोना महामहामारीनंतर ऑनलाईन प्रशिक्षण ही बाब आता अपरिहार्य ठरली आहे. यादृष्टीने यशदामध्ये करण्यात आलेले प्रयोग वैशिष्ट्यपूर्ण असून त्यामध्ये आणखी सुधारणा कशी करता येईल, याचा विचार येथे अभिप्रेत आहे.

अ) आंतरराष्ट्रीय स्तर

यशदा ही संस्था देशामध्ये नामवंत संस्था असून यशदाने आंतरराष्ट्रीय पातळीवरसुद्धा काही सामंजस्य करार केले आहेत. अमेरिका, इंग्लंड, जपान, रशिया, चीन इत्यादी देशात कार्यरत असलेल्या प्रशिक्षण प्रणालीचा अभ्यास करून यशदामध्ये सातत्याने बदल केले जातात. व प्रशिक्षण कार्यात सुधारणा केली जाते. प्रशिक्षणातील बदलत्या व्यवस्थापन तंत्राचा अभ्यास करून नवीन व्यूहरचना करण्यात आली आहे.

ब) राष्ट्रीय स्तर

यशदा देशामधील अग्रेसर प्रशिक्षण संस्था आहे. या संस्थेने मध्यप्रदेश, गुजरात, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश इत्यादी राज्यात प्रशिक्षण संस्थांना मार्गदर्शन केले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्यही प्रस्थापित करण्यात आले आहे. अनुभवांच्या आदान-प्रदानामुळे प्रशिक्षण कार्यात सुधारणा करणे शक्य झाले आहे.

क) प्रादेशिक स्तर

यशदाने महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागात प्रादेशित पातळीवर प्रशिक्षण कार्यक्रम आखले आहेत. तसेच प्रादेशिक स्तरावर विभागीय व जिल्हा प्रशिक्षण संस्थाच्या माध्यमातून स्थानिकांना प्रशिक्षण कार्यात

समाविष्ट करून घेतले आहे. त्यामुळे प्रादेशिक पातळीवर प्रशासकीय सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक गरजा लक्षात घेऊन प्रशिक्षण देणे शक्य झाले आहे.

७) अभ्यास विषयाची व्याप्ती

कुठलाही अभ्यास विषय किती सर्वसमावेशक आहे याची मांडणी व्याप्तीमध्ये केली जाते. या अभ्यासाच्या व्याप्तीबाबत पुढील पैलू मांडता येतील. . हा अभ्यास संपूर्ण महाराष्ट्र राज्याशी निगडित आहे. म्हणजे या अभ्यासाचे परिक्षेत्र संबंध महाराष्ट्र आहे.

यशदामध्ये आयोजित केले जाणारे विविध प्रकारचे प्रशिक्षण त्यातील अभ्यासाचे विषय, प्रशिक्षणाची प्रणाली, मूल्यमापन इत्यादी पैलुंचा विचार या संशोधनात करावयाचा आहे. कुठल्याही संस्थेचा विकास हा मूल्यमापनावर आधारलेला असतो. त्यामुळे हे संशोधन करताना यशदाच्या कामगिरीबाबत केवळ समाधान न व्यक्त करता त्यामध्ये आणखी सुधारणा कशा करता येतील याचा शास्त्रीय आढावा घ्यावयाचा आहे.

८. नियोजित संशोधन कार्याचा आराखडा

- पहिले वर्ष १०० ग्रंथांचे वाचन व टिपणे तसेच प्रश्नावलीचा विकास . दुसरे वर्ष प्रश्नावलीचे वितरण व मुलाखती तथ्य संकलन
- तिसरे वर्ष सात प्रकरणांचा विकास आणि अहवाल लेखन

९. संशोधन प्रबंधाचा आराखडा

या संशोधनात एकूण ७ प्रकरणांचा समावेश असेल. त्यांचा तपशील थोडक्यात पुढे दिला आहे.

१) प्रस्तावना

२) संशोधन पद्धती

३) प्रकाशित साहित्याचा आढावा

४) यशदाची प्रशासकीय संरचना, कार्य व कार्यपद्धती.

५) यशदाद्वारे राबविण्यात येणारे विविध उपक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम

६) लोकप्रशासन विकासात यशदाचे योगदान (क्षेत्रीय पाहणीचा अहवाल)

७) निष्कर्ष व शिफारस

प्रकरण एकः प्रस्तावना

या प्रकरणामध्ये अभ्यास विषयाची पार्श्वभूमी मांडण्यात येईल. तसेच संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्टे, स्वरुप व व्याप्ती स्पष्ट करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र, लोकप्रशासन आणि यशदा या तीन संकल्पना स्पष्ट करण्यात येतील. या प्रकरणाच्या शेवटी पुढील संशोधनकार्याची दिशा स्पष्ट करण्यात येईल

प्रकरण दोन : संशोधन पद्धती

या प्रकरणात अभ्यास विषयाची गृहितके मांडण्यात येतील व त्यादृष्टीने उपयुक्त अशा वर्णनात्मक आराखाड्याचे स्पष्टीकरण करण्यात येईल. या प्रकरणामध्ये अभ्यास विषयासाठी सुनियोजित केलेल्या वर्णनात्मक आराखडा या प्रणालीवर प्रकाश टाकण्यात येईल. तसेच या संशोधनासाठी वापरावयाच्या सामाजिक पाहणी, आशय विश्लेषण या दोन घटकांवर विशेष प्रकाश टाकण्यात येईल. तसेच तथ्य संकलन प्रणाली व मर्यादाही स्पष्ट करण्यात येतील.

प्रकरण तीन : प्रकाशित साहित्याचा आढावा

महाराष्ट्रातील लोकप्रशसनात यशदाचे महत्त्व अभ्यासताना उपयुक्त अशा चाळीस ग्रंथांचा व नियतकालिकांचा साक्षेपी आढावा घेण्यात येईल. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक, स्थानिक ग्रंथ थोडक्यात स्पष्ट करण्यात येतील. तसेच पूर्व संशोधकांच्या क्षमता व मर्यादा याचेही स्पष्टीकरण करण्यात येईल.

प्रकरण चार : यशदाची प्रशासकीय सरंचना, कार्य व कार्यपद्धती

या प्रकरणात यशदाची प्रशासकीय सरंचना, यशदाचे कार्य व कार्यपद्धती व यावर प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण पाच : यशदाद्वारे राबविण्यात येणारे विविध उपक्रम व प्रशिक्षण

या प्रकरणात यशदामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर प्रकाश टाकण्यात येईल व यशदाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती देण्यात येईल.

प्रकरण सहा : लोकप्रशासन विकासात यशदाचे योगदान

या प्रकरणामध्ये आधुनिक लोकप्रशासनातील सिद्धांताचा वापर करून यशदाच्या कामगिरीचे शास्त्रीय विश्लेषण करण्यात येईल. या प्रकरणामध्ये ३०० उत्तरदात्यांनी दिलेल्या माहितीचा गोषवारा, आलेख व तालिकेच्या आधारे स्पष्ट करण्यात येईल. तसेच ३० तज्ज्ञांच्या मुलाखतींचाही आढावा घेण्यात येईल. असे विश्लेषण करताना मान्यवर तज्ज्ञांच्या मतांचा व सिद्धांतांचा आधार घेण्यात येईल. तसेच त्या आधारे

यशदाच्या भावी वाटचालीसाठी नमुनेदार मार्ग (ब्ल्यू प्रिंट प्लॅन) याचा रोड मॅप तयार करण्यात येईल.

प्रकरण सात : निष्कर्ष

या प्रकरणाच्या पहिल्या भागात प्रकरणाचा सारांश देण्यात येईल आणि दुसऱ्या भागात बारा ठळक निष्कर्ष मांडण्यात येतील. तसेच नवी सैद्धांतिक मांडणी प्रस्तूत करण्यात येईल.

१०. अपेक्षित फलिते

या संशोधनातून पुढील तीन अपेक्षित फलिते साध्य होतील.

१ यशदाच्या प्रशिक्षण कार्यात नवे रूप देण्यासाठी नवा आराखडा तयार करण्यात येईल व तो पुढील दहा वर्षांसाठी उपयुक्त ठरेल.

२ विविध देशातील व प्रांतातील सैद्धांतिक व तौलनिक अभ्यास करून त्या आधारे नवे विषय व नवे अभ्यासक्रम सूचित करण्यात येतील.

३ प्रशिक्षणाचा दर्जा किती व कसा वाढत आहे याचे शास्त्रीय मूल्यमापन करून दर्जावाढीसाठी नव्या मानकांचा विकास करण्यात येईल.

संदर्भ सूची

1 R.K. Sapru
Development Adminstration
Strerlin Publishers Private Limited- New Delhi, 2001

2 Ram Ahuja
Research Methods
Prem Rawat for Rawat Publications, Jaipur,2017

3. Nancy G. Mcnulty
Training Managers The International Guide Harper & Row, Publishers, New York, Evanston and London, 1969

4. Yang Liju Shan
Wei New Humanism and Global Governance World Scientific Publishing Co. Pte. Ltd., Singapore, 2019

5. Shefali Kalia
Good Governance and Development
New Century Publication, New Delhi, 2004

6. S.Nakkiran R.Karunakaran
Hand Book on Training and Development
Deep & Deep Publications Pvt. Ltd., New Delhi, 2011

7. Dr. J.K. Talati
Encyclopedia of Educational Technology and Statistical Research
Methods Paradise Publishers, Jaipur, 2018

8 John L. Daly
Training in Development NationsA Handbook for Expatriates
New Elegant Printer, New Delhi, 2006

9. Dr. Annamalai Murugan
Public Administration 2 Parts (Part-1)
SSDN Publishers & Distributors, New Delhi, 2018

10 Rakesh Hooja
Rajesh Singh
V.K. Sharma
Training for Governance in the States
Indian Institute of Public Administration, New Delhi, 2011

11 Rolf P. Lynton
Udai Pareek Training for Development
Sage Publications India Pvt. Ltd., New Delhi, 2011

12 Sue Bishop David Taylor
Training for Change A Sourcebook of Activities
Viva Books Private Limited, New Delhi, 1999

13 Ratnakar Gaikwad,IAS
Initiatives in Development Adminsitration
Mandar Traders, Pune

१४ शेखर गायकवाड
प्रशासनाच्या नव्या वाटा
श्री पुस्तकश्री प्रकाशन, गोरेगाव, २०१२

१५ प्रा. उलगडे लक्ष्मण भारतीय प्रशासन
अरुणा प्रकाशन, लातूर, २०११

१६ प्रमोद बत्रा, विजय बत्रा
कशी वाढवावी कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता ?
साकेत प्रकाशन प्रा. लि. , पुणे, २००४

१७ प्रा. डॉ. अशोक नाईकवाडे,
प्रा डॉ. पंडित नलावडे
महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१३

१८ लक्ष्मीकांत देशमुख
बखर : भारतीय प्रशासनाची साधना प्रकाशन ९२६,
सदाशिव पेठ, पुणे, २०११

१९ डॉ. राजेंद्र पवार
प्रशिक्षक कौशल्य अभ्यास
यशदा, पुणे

२० डॉ. मनोज कुलकर्णी
प्रशिक्षणाचे पैलू
यशदा प्रकाशन, पुणे २०२०

२१ डॉ. नंदकुमार नाईक प्रशासकीय यंत्रणा
ओरिएंट प्रेस लि., तारापूर, जि. ठाणे,२००४

२२ यशदा माहिती पुस्तिका
प्रकाशक : यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे, २००९

२३ श्रीनिकेतन
लोकप्रशासन श्रीनिकेतन प्रकाशन
, नाशिक, २०१४

२४ यशदा वार्षिक अहवाल
यशदा, प्रकाशन, पुणे, २०१९

२५ डॉ. बबन जोगदंड
विकास प्रशासनात माध्यमांची भूमिका
वाचन साहित्य यशदा, प्रशिक्षण – २०१८

डॉ. बबन जोगदंड	डॉ. बी. आर. कत्तुरवार
संशोधक विद्यार्थी	संशोधन मार्गदर्शक